



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

आजचा रंग हिरवा!



संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

वर्ष : ०५ | अंक : ४२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२६ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## एसी लोकलवर चढलेल्या मनोरुग्णाला विजेचा धक्का



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, दिवा (ठाणे) :** दिवा कोपर रेल्वे स्टेशनदरम्यान एसी लोकलच्या छतावर चढलेल्या एका मनोरुग्णाला विजेचा जोरदार धक्का लागल्याची घटना उघडकीस आली. ओव्हर हेड वायरच्या धक्क्याने हा मनोरुग्ण होरपळला. त्याच्या अंगावरचे कपडेही जळाले होते.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून कल्याणला जाणारी एसी लोकल मंगळवारी सकाळी दिवा रेल्वे स्थानकात पोहोचली. दिवा रेल्वे स्टेशन सोडल्यानंतर रेल्वेच्या छतावरून शॉर्टसर्किट झाल्याचा आवाज आल्याने प्रसंगावधान राखत मोटरमनने गाडी थांबवली असता एक माथेफिरू एसी लोकलच्या छतावर बसल्याचे उघड झाले. दरम्यान रेल्वे कर्मचारी शरद आलिमकर, देवेश पाटील, प्रदीप मोरे, सफाई कामगार मुकादम, हमाल बिरबल, रेल्वे लोहमार्ग पोलीस नंदकिशोर राऊत, प्रदीप पवार यांनी तातडीने धाव घेत त्या तरुणाला खाली उतरवले. पोलिसांनी त्याला कळवा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तेथील डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी त्याला सायन रुग्णालयात पाठवले.

## तरुणाच्या पोटातून २९ चमचे, १९ ब्रश, २ पेन काढले



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, लखनऊ :** उत्तर प्रदेशच्या हापूड जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. पोटदुखीची तक्रार घेऊन रुग्णालयात पोहोचलेल्या एका व्यक्तीवर डॉक्टरांनी शस्त्रक्रिया केली. त्याच्या पोटात सापडलेल्या वस्तू पाहून डॉक्टरांना धक्का बसला. रुग्णाच्या पोटात चमचे , टूथब्रश आणि पेन सापडले. शस्त्रक्रिया करुन या सगळ्या वस्तू पोटातून काढण्यात आल्या.

सचिन नावाचा व्यक्ती व्यसनाच्या आहारी गेला होता. कुटुंबियांनी त्याला नशा मुक्ती केंद्रात दाखल केलं. त्यामुळे संतापलेल्या सचिननं स्टिलचे चमचे, टूथब्रश आणि पेन खाण्यास सुरुवात केली. काही दिवसांनंतर त्याची प्रकृती बिघडली. त्यामुळे त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्याच्या पोटात तीव्र वेदना सुरु होत्या. त्याच्यावर शस्त्रक्रिया करुन पोटातून चमचे, ब्रश आणि पेन काढण्यात आले.

हापूडमधील देवनंदिनी रुग्णालयातील डॉक्टर श्याम कुमार यांनी सचिनची तपासणी केली. तपासणी पूर्ण झाल्यावर त्यांना धक्काच बसला. कारण सचिनच्या पोटात बऱ्याच धातूच्या वस्तू होत्या. यानंतर डॉक्टरांच्या एका पथकानं त्याच्यावर शस्त्रक्रिया केली. यावेळी रुग्णाच्या पोटातून स्टिलचे २९ चमचे, १९ टूथब्रश आणि २ पेन काढण्यात आले. ४० वर्षांचा सचिन बुलंदशहरचा रहिवासी आहे. तो व्यसनांच्या आहारी गेला होता.

## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात ग्रामपंचायत चिंतलधा बा जिल्ह्यातून प्रथम



**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.२५, पोंभुर्णा :** पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग अंतर्गत संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सन २०२४/२५ मध्ये जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल प्रशस्तीय पत्र देऊन गौरविण्यात आले. आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते प्रशस्तीय पत्र देऊन गौरविण्यात आले. अभियान राबवताना ग्रामपंचायत कमिटीगावातील महिला बचत गट पुरुषवर्ग व्यापारी वर्ग तंटामुक्त समिती पोलीस पाटील इत्यादींनी सहभाग नोंदवून सहकार्य केलं तसेच यापुढे सुद्धा मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराजअभियानात सहभाग नोंदवून व माजी वसुंधरा स्पर्धेत सुद्धा प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी शपथ घेण्यात आली. तसेच पंचायत समितीचे बीडीओ बांगर मॅडम, बेलारवार साहेब, विस्तार अधिकारी खोडके साहेब, प्रवीण निमकर, गोरंत वार यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. या सर्वांचे सरपंच शुभांगी कुत्तरमारे, उपसरपंच रोशन ठेगणे, ग्रामपंचायत अधिकारी आनंद कटकवार यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला उपस्थित आमदार सुधीर मुनगंटीवार,अलका आत्राम, जगन येलके, उपविभागीय अधिकारी लगी तिवारी, तहसीलदार मोहनी शेलवटकर, वाणी मॅडम, संवर्ग विकास अधिकारी बांगर मॅडम, विस्तार अधिकारी खोडके उपस्थित होते.

# सर्व निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सरसकट मदत

## दिवाळीपूर्वी मदतीचे वितरण करणार !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, लातूर :** राज्यात अनेक ठिकाणी ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने नद्यांना पूर आला आहे. पिकांचे नुकसान झाले असून जमीन खरडून गेली आहे. या संकटकाळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून सर्व निकष बाजूला ठेवून सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत केली जाईल. तसेच दिवाळीपूर्वीच ही मदत शेतकऱ्यांना वितरित करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी औसा तालुक्यातील उजनी आणि निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी येथे अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली.

जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार ओमप्रकाशराजे निंबाळकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार संजय बनसोडे, आमदार रमेश कराड, आमदार राणा जगजितसिंह पाटील, आमदार कैलास पाटील, माजी आमदार बसवराज पाटील, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, उजनी येथे उपस्थित होते. तर औराद शहाजानी येथे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, विभागीय आयुक्त पापळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल मीना, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता आय.एम. चिश्ती उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वप्रथम औसा ते तुळजापूर महामार्गावरील पुलावरून तेरणा नदीपात्राची, नदीला आलेल्या पुरामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीची पाहणी केली. त्यानंतर उजनी गावालगत असलेल्या तेरणा नदीपात्राची व पुरामुळे गावातील घरे, दुकानांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी करून शेतकरी, ग्रामस्थांकडून शेतपिकांच्या नुकसानीची माहिती घेतली.

टंचाईच्या काळात लागू असलेल्या उपाययोजना अतिवृष्टीतही लागू करण्यात येतील. शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी घरात, दुकानात शिरल्याने झालेल्या नुकसानीचीही मदत देण्यात येईल. मंगळवारीच राज्य शासनाने नुकसानग्रस्तांसाठी मदतीचा २ हजार २०० कोटींचा पहिला हप्ता मंजूर केला. ज्याप्रमाणे नुकसानीचे अहवाल प्राप्त होतील, त्यानुसार अधिकची मदत केली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उजनी गावालगत तेरणा नदीवर औसा व तुळजापूर तालुक्याला जोडणाऱ्या पुलाची उभारणी, तसेच उजनी गाव ते राष्ट्रीय महामार्गावरील उजनी मोडला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाला मंजुरी देण्याची घोषणाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली.

पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नदीकाठच्या जमिनी खरडून गेल्याने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक फटका बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिकची मदत मिळावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी केली. आमदार संजय बनसोडे यांनीही उदगीर, जळकोट तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीच्या मदतीबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले.

**बांधावर जाऊन मुख्यमंत्र्यांनी जाणून घेतल्या शेतकऱ्यांच्या व्यथा**

महाराष्ट्र, कर्नाटक सीमेवर तेरणा आणि मांजरा नदीच्या संगमावर असलेल्या औराद शहाजानी येथील नुकसानग्रस्त भागाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधला. शेतकरी शिवपूत्र आगरे यांनी त्यांच्या शेतात शिरलेल्या पाण्याची आणि नुकसानीची व इतर ग्रामस्थांनी मूग, उडीद, मका, सोयाबीन आदी पिकांच्या नुकसानीची माहिती मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना दिली. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास त्यांना दिला. शेतकऱ्यांनी काळजी करू नये, शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्र्यांनी दिली.

कमी कालावधीत अधिक पाऊस पडल्यामुळे नदीमध्ये येणाऱ्या पाण्यात अचानक वाढ होते, त्यामुळे पूर परिस्थिती निर्माण होते, त्यासाठी नदीवर बॅरेजसची उभारणी करून पुरावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. औराद शहाजानी येथील पुराचा प्रश्न सोडविण्यासाठी पूर संरक्षक भिंत बांधण्यात येईल. जुन्या बॅरेजसच्या नूतनीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल. या बॅरेजसला आधुनिक पद्धतीचे दरवाजे बसविण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

औराद येथे मांजरा व तेरणा नद्याच्या संगमामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. पिकाच्या नुकसानीसह जमीन खरडून गेली आहे. मांजरा, तेरणा नदीच्या संगमामुळे नदी पात्र वाढते, म्हणून आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी काही बॅरेजेसबाबत सुचवले आहे, त्यानुसारही कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**पंचनाम्यासाठी ड्रोन, मोबाईल फोटो ग्राह्य...**

नुकसान झालेल्या भागातील पंचनाम्याची कार्यवाही सुरू आहे. ज्या भागात पाणी शिरले अशी नोंद आहे, पण तिथे पोहचणे शक्य नाही, अशा ठिकाणी ड्रोनद्वारे करण्यात आलेला पंचनामाही ग्राह्य धरण्यात येईल. तसेच मोबाईलवरील फोटोही स्वीकारण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# रविवारी मंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत बीडमध्ये महाएल्गार मेळावा

## अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व ओबीसी बांधव सहभागी होणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहिल्यानगर :** ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष, राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ओबीसी समाजाचा भव्य महाएल्गार मेळावा रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी बीड येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती समता परिषदेचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सुभाषराव लोंढे यांनी दिली आहे.

हैदराबाद गॅझेटिअरच्या माध्यमातून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण लागू करण्याचा जीआर महाराष्ट्र शासनाने काढला असून, यामुळे ओबीसी समाजामध्ये कमालीची भीती आणि सरकार विरोधात प्रचंड असंतोष पसरला आहे. मराठा समाज बांधवांना आरक्षण देण्याला ओबीसी समाजाचा विरोध नाही, मात्र ओबीसी समाजाच्या आरक्षणावर अन्याय करणारा निर्णय महाराष्ट्र शासन घेत असल्याने या निर्णयाच्या विरोधात राज्यातील ओबीसी समाज बांधवांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. ओबीसी आरक्षण संपुष्टात येते की काय? या भीतीमुळे ओबीसी समाजातील नागरीक आत्महत्या सारखे शेवटचे पाऊल उचलू लागले आहेत. यामुळे ओबीसी समाजाला धीर देण्यासाठी आणि ओबीसी समाजाचे आरक्षण



स्वतंत्र आणि अखंड ठेवण्यासाठी या महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यास ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते मंत्री छगन भुजबळ यांच्यासह राज्याबाहेरील नेते आणि ओबीसी समाजातील राज्यातील नेते मार्गदर्शन करणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सुभाषराव लोंढे यांनी दिली आहे.

या मेळाव्यास अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व ओबीसी बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, प्रदेश सरचिटणीस अंबादास गारुडकर, प्रदेश प्रवक्ते डॉ. नागेश गवळी, प्रदेश प्रचारक मुकुंद सोनटक्के, प्रदेश चिटणीस अनिल निकम, जिल्हा कार्याध्यक्ष अर्जुन मेहेत्रे, महिला जिल्हाध्यक्षा संगीताताई ढवळे, अरविंद सोनटक्के वसंत रांधवण, बबनराव घुमटकर, नवनाथ खामकर, संजय डाके, शिवाजी राऊत, सुनील शिंदे, कल्याण अनारसे, नागनाथ वाळके, सोमनाथ घाडगे, सुरेश थोरात, भिमराव बनसोडे, रामदास फुले यांनी केले आहे.

## सरसकट पंचनामे करा : कृषी मंत्री दत्ता भरणे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** अतिवृष्टीमुळे पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. ओला दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने पिकं पडली, वाहून गेली आणि शेतकरी आर्थिक संकटात सापडले. या पार्श्वभूमीवर विधानसभा सदस्य काशिनाथ दाते सर यांनी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री नामदार दत्ता मामा भरणे यांना पत्र देत शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी केली आहे.

आमदार दाते यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, अतिवृष्टीमुळे मतदारसंघातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. कृषी व महसूल विभाग पंचनामे करत आहेत. मात्र, शेतकऱ्यांना वेळेवर दिलासा मिळणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे तातडीने आर्थिक नुकसान भरपाई द्यावी.

याच पार्श्वभूमीवर कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी पारनेर तालुक्यातील नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून



प्रस्ताव सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले.

यावेळी बोलताना कृषीमंत्री भरणे म्हणाले, शेतकऱ्यांच्या आयुष्यभराच्या स्वप्नांचे या पावसात नुकसान झाले आहे. शासन त्यांच्या पाठीशी ठाम उभे आहे. पंचनामे पूर्ण होताच मदत निधीचा शासन निर्णय त्वरीत जाहीर होईल.

या पाहणीवेळी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, महिला जिल्हा उपाध्यक्षा सोनाबाई चौधरी, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे, भाजप सरचिटणीस सागर मैड, जिल्हा उपाध्यक्ष विकास पवार, उद्योजक मंगेश दाते, शिवसेना उपतालुकाप्रमुख अजिंक्य दरेकर, सरपंच मनोज मुंगशे, दिपक शेळके यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## संपादकीय



### सदाबहार अभिनेते

हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार, चिरतरुण आणि चॉकलेट हिरो असे ज्यांचे वर्णन केले जायचे ते जेष्ठ सिनेअभिनेते दिवंगत देव आनंद यांची आज १०२ वि जयंती. १०२ वर्षांपुर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ सप्टेंबर १९२३ रोजी त्यांचा जन्म झाला. हे त्यांचे जन्म शताब्दी वर्ष आहे. देव आनंद यांचे मूळ नाव देवदत्त पिशोरीमल आनंद असे होते. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. लाहोरमधील कॉलेजमध्ये १९४२ साली त्यांनी संगीतात ग्रॅज्युएशन पूर्ण केले. तिथेच त्यांची खुशवंत सिंग व बलराज साहनी यासारख्या दिग्गज व्यक्तिमत्वाशी भेट झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काहीकाळ नोकरीही केली मात्र नोकरीत त्यांचे मन रमले नाही. लवकरच त्यांनी नोकरी सोडून चित्रपटाची वाट धरली. प्रभात कंपनीच्या हम एक है या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. मात्र त्यानंतर त्यांचे काही चित्रपट आपटले. त्यांच्याच कंपनीचा म्हणजे नवकेतनचा अफसर हा चित्रपट देखील पडला मात्र या अपयशाने ते डगमगले नाही. अपना भी टाइम आयेगा.... असे ते त्यावेळी निर्मात्यांना म्हणत असत त्यांनी अभिनय केलेला बाजी हा चित्रपट पडद्यावर आला आणि त्यांचे हे बोल खरे ठरले. बाजी हा चित्रपट तिकीट बारीवर यशस्वी ठरला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली या चित्रपटाने त्यांना नायक म्हणून मान्यता दिली. या चित्रपटानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. केसांचा तुरा, गुलछबू आणि देखणी चेहरेपट्टी यामुळे उठून दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाने प्रेक्षकांच्या हृदयात स्थान मिळवले. ते प्रेक्षकांचे आवडते नायक बनले. त्यांचे सर्व चित्रपट हिट होऊ लागले. बाजी, मुनीमजी, दुष्मन, कालाबाजार, सीआयडी, पेईंग गेस्ट, गॅम्बलर , तेरे घर के सामने, काला पाणी, जाल, गाईड, तेरे घर के सामने, छुपा रुस्तम, हरे रामा हरे कृष्णा, हिरा पन्ना, देस परदेस, ज्वेल थिप, जॉनी मेरा नाम, अव्वल नंबर, स्वामी दादा असे त्यांचे सर्वच चित्रपट यशस्वी ठरले. १९५० ते १९७० असे जवळपास दोन दशके त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. राज कपूर आणि दिलीप कुमार यांच्यासारख्या तगड्या नायकांसमोर त्यांनी मोठे आव्हान उभे केले. त्याकाळात या तिघांना हिंदी चित्रपट सृष्टीतील त्रिदेव असे म्हंटले जायचे कारण या तिघांनी तो काळ अक्षरशः गाजवून सोडला होता. देव आनंद आणि राज कपूर यांच्यापेक्षा देव आनंद यांचे चाहते अधिक होते विशेषतः त्या काळातील तरुणाईने त्यांना डोक्यावर घेतले होते. त्यांचा चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो पाहण्यासाठी तरुण कॉलेज सोडून चित्रपट गृहाबाहेर रांगेत उभे असायचे. तरुण मुली तर त्यांच्यासाठी अक्षरशः वेड्या झाल्या होत्या. त्यांची एक झलक पाहण्यासाठी मुली घरातून पळून मुंबईला येत असत. त्यांच्या यशात त्यांच्या गाण्यांचा देखील खूप मोठा वाटा आहे. त्यांच्या बहुतेक चित्रपटाला सचिन देव बर्मन यांचे संगीत लाभले. सदाबहार गायक किशोर कुमार हे त्यांच्यासाठी गाणी गात. संगीतकार सचिन देव बर्मन, गायक किशोर कुमार आणि पडद्यावरील नायक देव आनंद हे त्रिकुट असे काही जमले की त्यांच्या अनेक गाण्यांनी इतिहास घडवला. तू कहा ये बता, देखो रुठो ना करो, एक घर बनाएंगे तेरे घर के सामने, दिल का भवर करे रे पुकार, गाता रहे मेरा दिल, मै जिंदगी का साथ निभाता चला गया, चुडी नही मेरा दिल दिल है दिल, फुलो का तारों का सबका कहना है, दिन ढल जाये, छोड दो आंचल जमाना क्या कहेगा यासारखी त्यांची असंख्य गाणी आजही लोकप्रिय आहेत. आजही ही गाणी आवर्जुन ऐकली जातात. देव आनंद यांनी केवळ चित्रपटात अभिनयच केला असे नव्हे तर त्यांनी काही चित्रपटांसाठी पटकथा लेखन केले तर काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. आंधिया, हरे रामा हरे कृष्णा, हम नौजवान, अव्वल नंबर, प्यार का तराना, गँगस्टर, मै सोलह बरस की, सेन्सॉर या चित्रपटासाठी त्यांनी पटकथा लेखन केले तर हिरा पन्ना, देस परदेस, लूटमार, स्वामी दादा, सच्चे का बोलबाला, अव्वल नंबर अशा काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. अभिनयासाठी त्यांना अनेक फिल्मफअर पुरस्कार तर मिळालेच पण भारत सरकार कडूनही त्यांना मानाचा पद्मभूषण पुरस्कार मिळाला. चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कारही त्यांना मिळाला. ३ डिसेंबर २०११ रोजी त्यांचे निधन झाले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपट रसिकांच्या मनावर मोहिनी घालणाऱ्या या सदाबहार अभिनेत्याला त्याच्या १०२ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

# नवरात्रोत्सव-मानवी जीवन जगण्याचे सूत्र



- विनोद जाधव
मासरूळ जि.बुलडाणा
मो.९७६३२८२०७७

**अनचारेन मालिन्यम अत्याचारेन मूर्खता।**
**विचाराचारयोयोर्ग: सदचार: स उच्यते ।।**

अर्थात आचार हिनतेमुळे जीवनास मालीन्य तर आचारधित्यामुळे मूर्खता येते. आचार व विचार यांचा सुंदर मेळ म्हणजे सदाचार होय. भगवान श्रीकृष्ण भगवद्गीते म्हणतात, यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्।। जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी अर्थात अधर्म बोकाळतो तेव्हा-तेव्हा तो अधर्म आचारणाऱ्या दृष्टांचा नाश करण्यासाठी मी युगानुरूप वारंवार अवतार धारण करेल. त्याचप्रमाणे ज्या काळात दैत्य दानवांनी अनाचार व अत्याचाराच्या रूपाने भूमीवर थैमान घातले त्या वेळी आदिशक्तीने दुर्गा रुपातील विविध अवतार धारण केले आणि सज्जनांची त्या दुर्जनांपासून मुक्तता करून सद्धर्म व सदाचार यांची तिने स्थापना केली. शक्ती देवीच्या महत्त्वकृत्याची दिव्य स्मरणगाथा म्हणून साजरा केला जाणारा दुर्गा महोत्सव भारतात कोणत्या ना कोणत्या रूपाने प्रचलित आहे. वर्षभर विविध ऋतुकाळात संपन्न होणाऱ्या दुर्गा पूजेमध्ये शरद ऋतूतील अश्विन शुक्ल प्रतिपदेपासून नवमीपर्यंत केला जाणारा नवरात्र महोत्सव विशेष प्रचलित व लक्षणीय आहे. आदिशक्तीनेच शारदीय महोत्सवाचे (महापूजेचे) महत्त्व सांगताना दुर्गा सप्तशती ग्रंथातील बाराव्या अध्यायात बाराव्या श्लोकात म्हटले की,

**शरत्काले महापूजा क्रियते या च वार्षिकी।**
**तस्यां ममैतन्माहात्म्यं श्रुत्वा भक्तिसमन्वित:।।**

अर्थात जो शरत्कालामध्ये वार्षिक महापूजा किंवा महोत्सव आयोजित करून त्याप्रसंगी देवीचे महात्म्य भक्ती भावाने ऐकेल त्याला सुख-समृद्धी लाभेल.

नवरात्रोत्सव संपूर्ण भारतातील बहुतेक कुटुंबात कुलधर्म स्वरूपात संपन्न होतो. हा महोत्सव नऊ दिवसांचा व रात्रीचा असल्यामुळे त्यास नवरात्र असे संबोधले जाते. या दिवसात संपन्न होणारी दुर्गापूजा आपापल्या कुलस्वामिनीच्या उदा. आई तुळजाभवानी, रेणुका माता, आई करवीर निवासिनी, आई एकविरा, आई कामाक्षी इ. स्वरूपात केले जाते. नवरात्रातील कथानकानुसार देवीने नऊ दिवस युद्ध करून महिषासुराचा वध केला, हेच महिषासुर सध्या कालात देखील मानवांच्या अंतर्मनात व वाईट कृत्यातून जसे की, भ्रष्टाचार, बलात्कार, व्यसनाधीनता, लुटारूवृत्ती, व्याभिचार, जातीय - धार्मिक दंगली अशा या विकार रुपाने कमी जास्त प्रमाणात थैमान घालत असून तेच मानवाच्या व समाजाच्या अधोगतीस कारणीभूत ठरत आहे. दुर्गा महोत्सवाचे औचित्य साधून याच वाईट प्रवृत्तीच्या महिषासुरांचा विनाश करायचा आहे. ज्याप्रमाणे नऊ दिवसांच्या युद्धानंतर देवी कडून महिषासुरांचे पारिपात्य झाले त्याचप्रमाणे आपल्यातील असुरांच्या नाशांची जिद्द मणि बाळगून नवरात्रीतील नऊ दिवस देवीच्या सानिध्यात मनोभावे आराधना केली असता हे उद्दिष्ट निश्चितच पूर्ण होते.

दुर्गा नवरात्र उत्सव काळात घटस्थापना केली जाते. या घटस्थापनेचे मानवी जीवनामध्ये काय महत्त्व आहे किंवा ते मानवी जीवनाचे सूत्र कसे आहे ते सांगायचे झाल्यास नवरात्रात घट, नंदादीप, पुष्पमाला व बिजारोपण या चार महत्त्वाच्या गोष्टी असून त्या मानवी जीवनाशी एकरूप आहे जसे की,नवरात्रातील घटस्थापनेमध्ये प्रथम म्हणजे मातीचा घट. हा विकारवश व नाशवंत देहाचे प्रतीक आहे,अर्थात मातीच्या घटाप्रमाणे मातीतून निर्मिलेला व मातीतच विसर्जित किंवा विलीन होणारा मानवी देह नाशवंत आहे. परत मातीतून जसे पुनर्निर्माण ही सृष्टीचक्रातील वास्तविकता सूचित होते त्याचप्रमाणे मानवी देह हा एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो मात्र चैतन्य रुपी आत्मा अमर आहे. ज्याप्रमाणे घटामध्ये वरुणरूपी चैतन्याची स्थापना केली जाते, त्याचप्रमाणे मानवी शरीरामध्ये आत्मारूपी चैतन्य प्रस्थापित केले जाते. नवरात्रोत्सवातील दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नंदादीप. नंदादीप हा ज्ञानमयी देवीचे प्रतीक आहे. अखंड प्रज्वलित राहणारा नंदादीप अंधकारावर मात करून चहुकडे प्रकाश पसरवत असतो त्याचप्रमाणे, ज्ञानाने मनुष्य प्रगल्भ होतो. अज्ञानरूपी अंधकारावर मात करून ज्ञानरूपी प्रकाशाची वाटचाल करतो तेव्हा, त्याला सत्याची जाणीव होते. सत्य शोधनानंतर मानवी जीवन विकसित होते, म्हणून ज्ञानरूपी नंदादीपाप्रमाणे, सतत ज्ञानाचे उपासक होऊन अज्ञानरूपी अंधकारावर मात करा.असे नंदादीपाप्रमाणे मानवी जीवनाचे सूत्र आहे. नवरात्रोत्सवातील तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुष्पमाला. ज्याप्रमाणे पुष्पमाला तयार करताना बागेतील अथवा परडीतील कीड लागलेली खराब झालेली फुले आपण बाजूला काढतो व छान, सुंदर, सुगंधित फुलांचा हार करून देवाला अर्पण करतो त्यामुळे, देवाजवळ वातावरण प्रसन्नमय होते, त्याचप्रमाणे वाईट कर्माचा त्याग करून सत्कर्म परमेश्वरास अर्पण करावे व पुष्पमालेचा सुगंध जसा इतरत्र पसरतो व सभोवतांलचे वातावरण प्रसन्नमय करतो, त्याचप्रमाणे आपल्या सत्कार्यांचा सुगंध चहू दिशा पसरावा. नवरात्रातील चौथी महत्वाची गोष्ट म्हणजे बिजरोपण.घट व नंदादीप समीप एका पत्रावळीवर किंवा बांबूच्या बारीक काड्यांपासून बनवलेल्या दुरडीमध्ये काळी माती टाकून त्यामध्ये सप्त धान्य किंवा नव धान्यांचे बिजारोपण केल्या जाते. बिजारोपण हे नवनिर्मितीचे प्रतीक आहे बिजारोपण झालेल्या धान्यातून नवांकुरासारख्या जिवात्म्याचे उन्नयन होते, त्याचप्रमाणे जीवन जगत असताना नवनवीन काहीतरी शोध लावायला हवा, परंतु त्यातून समाज विघातक कार्य न घडता मानव हित व समाजहीत जोपासल्या जायला हवे. सृष्टीचा विध्वंस व्हायला नको म्हणून बिजारोपणाप्रमाणे नवनिर्मिती करायला हवी.

हिंदू धर्मातील सर्व जातीपातीमध्ये प्राचीन काळापासून चालत आलेला नवरात्र महोत्सव त्यांच्या - त्यांच्या पथेप्रथेनुसार साजरा केला जात असे.क्षात्रवर्णीय लोक धर्मावरील संकट टाळण्यासाठी असूरी प्रवृत्तीच्या शत्रूचा पाडाव करण्यासाठी सिमोलंगणा नंतर युद्धास जात असत. सध्या कालीन बदललेली समाज रचना लक्षात घेता सर्व वर्गीयांसाठी प्रत्यक्ष युद्धावर जाण्याचे प्रयोजन नाही, परंतु आपल्यातील विकारुपी असुरांचे दमन अपेक्षित आहे.

अशा प्रकारे नवरात्राच्या या नऊ दिवसाच्या पूजापाठ उपासना सत्कार्य यातून जणू नव्याने जन्म झाल्याप्रमाणे आपल्यातील असुरी प्रवृत्तीवर मिळवलेला विजय हा नवरात्रीनंतर येणाऱ्या विजयादशमीच्या दिवशी साजरा केला जातो.नवरात्रोत्सव साजरा केल्यास मनातील विकारवशमता क्षीण होऊन, त्याने अध्यात्मिक उन्नती तर होईलच, परंतु त्याचबरोबर समाजसंस्था ही अधिकाधिक निकोप व एकसंध होण्यास सहाय्य होईल, म्हणून नवरात्रोत्सव हे मानवी जीवन जगण्याचे सूत्रच आहे असे म्हणावे लागेल.

**नवरात्रोत्सवाच्या सर्वांना शुभेच्छा...!**

# महाराष्ट्रात निसर्गाचा महाप्रलय...!

महाराष्ट्रावर महाप्रलयाचं संकट आलं आहे. नेहमीपेक्षा थोडा लवकरच सुरू झालेला पाऊस नवरात्रीतही आषाढासारखा कोसळतो आहे. अहिल्यानगरच्या दक्षिण भागापासून मराठवाड्याला कवेत घेत या पावसाने अर्ध्या विदर्भालाही अक्षरशः झोडपून काढलं आहे. सोलापूर आणि जळगाव जिल्ह्याचा काही भागही या पावसाच्या तडाख्यात सापडला आहे. जेमतेम पर्जन्यमानाच्या या प्रदेशाला कोकणापेक्षा अधिक मुसळधार पाऊस सोसणं कठीण आहे. पावसाच्या दीर्घकाळ आणि काही ठिकाणी ढगफुटीसारख्या कोसळण्याने या भागातील जनजीवन पूर्ण उद्धवस्त झालं आहे. विशेषतः शेतीचं झालेलं नुकसान अपरिमित आहे. महाराष्ट्राला मे महिन्यापासून पावसाचे चातकापेक्षाही जास्त वेध लागतात. अनेक ठिकाणी पाणीटंचाई जाणवू लागते. टँकरने होणारा पाणीपुरवठाही अपुरा पडू लागतो. माणसांना स्वतःच्या गरजा आणि पाळीव जनावरांच्या पाण्याच्या गरजा कशा भागवायच्या असा प्रश्न सतावत असतो. त्यामुळे, एकदा पाऊस सुरू झाला, की निम्मा महाराष्ट्र सुटकेचा निःश्वास टाकत असतो. राज्याचा त्यापेक्षा अधिक भाग पावसाने धरणं भरावी, तळी-विहिरी भराव्यात एवढीच माफक अपेक्षा ठेवून असतो. यावर्षी अनेक ठिकाणी ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीलाच पाणी चांगलं भरलं. जलाशय तुडुंब झाल्याने ग्रामीण भागात समाधान पसरलं. लोक उत्साहात होते. पण, ऑगस्टच्या शेवटापासून पावसाने आणखी जोर धरला तेव्हाच निम्म्या महाराष्ट्राचे धाबे दणाणले. नंतरच्या पावसाने शेतीचं, फळबागांचं नुकसान सुरू केलं. मराठवाड्यात आणि उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात याच काळात ढगफुटीसदृश पाऊस झाला.

परतीचा पाऊस जाता जाता दोन-चार ठिकाणी तडाखा देत असतोच. तसा इतिहास आहे. त्यामुळे, ऑगस्ट महिन्याच्या अखेरीला झालेलं नुकसान तिथेच थांबेल, अशी अटकळ होती. पण, प्रत्यक्षात पावसाचा जोर आणखी वाढला. सप्टेंबरचा दुसरा पंधरवडा उलटूनही पावसाचा जोर कमी होत नाही, हे लक्षात आलं, तेव्हाच जाणकारांना या वर्षीच्या महाराष्ट्रावरच्या संकटाची चाहूल लागली. अहिल्यानगरच्या दक्षिण भागातल्या दुष्काळी पट्टचातही असा पाऊस झाला, की गावंच्या गावं पुराने वेढली गेली.



चारचाकी गाड्या वाहून जातील, एवढ्या वेगाने पाण्याचे प्रवाह ऐन गावांतून गावांतून वाहत होते. गेल्या दोन दिवसांत पावसाचा हाच जोर सर्वदूर पसरला आहे. महाराष्ट्राचे अनेक जिल्हे आणि त्यातील अनेक तालुके अक्षरशः पाण्यात बुडाले आहेत.

महाराष्ट्रात यापूर्वीही पूर आले, महापूर आले. पण, अनेक जिल्ह्यांत एकाचवेळी रबरी बोटी आणि लष्कराच्या हेलिकॉप्टरच्या मदतीने ग्रामस्थांची, नागरिकांची सुटका करण्याची वेळ आली नव्हती. ती यावेळी आली आहे. या महाप्रलयाला 'महा' का म्हटलं, ते यावरून लक्षात येईल. या पावसाळ्यात हिमालयात अनेक ठिकाणी ढगफुटी झाल्या. पर्वताचे मोठे भाग ढासळले. गावंच्या गावं वाहून गेली. पंजाबातही ३० जणांचा बळी घेऊन पावसाने आपला रुद्रावतार दाखवला. पण, महाराष्ट्रात पठारी भागात पावसाने सातत्याने आपलं तांडव चालवलं असल्याने या भागातल्या उभ्या पिकांचं, फळबागांचं, शेतजमिनींचं, गाईगुरांचं आणि लोकांच्या निवाऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. पावसाने गावंच्या गावं साफ केली आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारला मोठी मदत करावी लागणार आहे. सुदैवाने या संकटाची चाहूल आधीच लागली असल्याने सरकारची यंत्रणाही बऱ्यापैकी तयारीत आहे. मंत्रिमंडळाच्या कालच्या बैठकीत त्यामुळे परिस्थितीचा आढावा घेऊन मदतीची प्राथमिक घोषणा झाली, ती दिलासादायक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूरग्रस्तांना दिलेला दिलासाही खूपच आश्वासक ठरला आहे. आपत्तीग्रस्त परिस्थितीचा पूर्ण आढावा घेऊन सर्व पंचनामे झाल्यानंतर एकत्रित मदत करण्याची पद्धत आतापर्यंत होती. यावेळी मात्र परिस्थितीनुसार जसजसे पंचनामे होत जातील, त्या त्या ठिकाणी त्यानुसार मदत पोहोचवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला, ही फार चांगली गोष्ट झाली. त्यामुळे, मदत लवकर पोहोचेल आणि पुनर्वसनालाही लवकर सुरुवात होईल. धोका एवढाच, की यामुळे पंचनाम्यांबाबतच्या तक्रारी दीर्घकाळ सुरू राहतील. त्या राहूच नयेत, यादृष्टीने स्थानिक प्रशासनाला सक्त सूचना देण्याची गरज आहे. या महाप्रलयातून ज्यांची सुटका करावी लागली, त्यांची संख्या शेकड्यात असली, तरी विस्थापितांची संख्या काही लाखांत असणार आहे. घरांची पडझड, शेतजमिनींचं नुकसान, शाळांच्या, तलाठी कार्यालय ग्रामपंचायत इमारतींचं नुकसानही मोठं असणार आहे. एवढा सगळा भार राज्य सरकार एकट्याच्या बळावर उचलू शकेल, असं दिसत नाही. त्यासाठी केंद्र सरकारच्या सढळ मदतीची गरज जाणवणार आहे. देशात अनेक ठिकाणी हे अस्मानी संकट कोसळलं असल्याने केंद्र सरकारलाही त्याची जाणीव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी त्या आनुषंगाने केंद्रातील महत्त्वाच्या मंत्र्यांना, अधिकाऱ्यांच्या पथकाला पाहणी करण्यास सांगून मदत जाहीर करतीलच. या मदतीचा समन्वय ठेऊन त्यातून प्रभावी काम होणं आणि कमीत कमी वेळेत ग्रामीण जीवन पूर्वपदावर आणणं हेच पुढचं आव्हान आहे. स्वयंसेवी, नागरी संस्थांनीही त्यासाठी लगेच पुढाकार घ्यायला हवा.




**कव्हर स्टोरी**
- शिवाजी विठ्ठल चौगुले.
कागल-कोल्हापूर..

# वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू ! मोहर्ली वनपरिक्षेत्रातील घटना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** मोहर्ली वनपरिक्षेत्रातील सितारामपेठ बिटात बुधवार, दि. २४ सप्टेंबर ला सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास वाघाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. अमोल बबन नन्नावारे (३८, रा. भामडेळी, ता. भद्रावती) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.



अमोल नन्नावारे हे सकाळी मौजा भामडेळी (रै.) येथील गट क्रमांक ०४ मधील शेतामध्ये काम करीत होते. अचानक वाघाने हल्ला करुन त्यांना ठार केले. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे, भद्रावती पोलीस ठाण्साचे पोलीस निरीक्षक योगेश पारधी वमपाल आणि क्षेत्रीय वनरक्षक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करुन मृतदेह ग्रामीण रुग्णालय भद्रावती येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. मृत शेतकरी अमोल नन्वारे यांच्या पत्नी प्रेमिला नन्वारे यांना शासनाकडून ५० हजार रुपयाची मदत देण्यात आली.

दरम्यान, परिसरात कॅमेरा ट्रॅप बसविण्यात आले असोून, गावकऱ्यांना शेतात काम कपण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. घटनेचा पुढील तपास मोहर्ली वमपरिक्षेत्र अधिकारी करीत आहे.

## स्कंधमाता

स्नेह कुंभ भरे तुडूंब
प्रतिपाळ करी जगता
रुप पंचमी जगन्माता
पंचम् रात्रीस जागता

पद्माश्रित तू करद्वया
यशस्विनी स्कंधमाता
शुभदीस्तु सदा देवी
गं नित्य सिंहासनगता

भगवान स्कंद कमार
काखेत बाळ स्वागता
दर्शन मात्रे भय हरण
आदिशक्ती शरणागता

पुजिता पंचमि ललिता
देव्या जागरात रंगता
भर भरुन देशी संपदा
आदिजननीअभ्यागता

सूर्य मंडळ अधिष्ठात्री
प्रभा मंडल संयोगिता
उपासना हो अंतरातून
ध्यान वृत्तीत एकाग्रता

हरपले भान भक्ती रंगे
गरबादांडिया उसळता
नर नारी भेद विरघळे
उत्साहअंगी सळाळर्ता

**- हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## गोविंद ससाणे यांची राष्ट्रवादी(अजित पवार)गटाच्या ओबीसी सेलच्या केज तालुका अध्यक्षपदी निवड

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२४, केज :** सोनीजावळा येथील सरपंच गोविंद ससाणे यांची राष्ट्रवादी (अजित पवार) गटाच्या ओबीसी सेलच्या केज तालुका अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री मा. अजित पवार यांच्या निर्देशानुसार व ज्येष्ठ नेते रमेश आडसकर यांच्या सूचनेनुसार,युवा नेते ऋषिकेश आडसकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड ओबीसी सेलचे बीड जिल्हाध्यक्ष विजय धायगुडे यांनी गोविंद ससाणे यांची निवड केली. या निवडीमुळे गावकऱ्यांकडून गोविंद ससाणे यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी पत्रकार परिषद घेऊन ससाणे यांनी आपल्या केलेल्या निवडीबद्दल वरिष्ठांचे आभार मानले. तसेच सध्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना खूप संकटांना सामोरे जावे लागत आहे, अतिवृष्टीमुळे पीक जणवारे वाहून गेले आहेत. यासंदर्भात आपण अजित दादा पवार यांची भेट घेऊन शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत कशी मिळेल यासाठी प्रयत्न करणार आहोत असे सांगितले. पुढे बोलताना तरुणांनी उद्योग धंद्याकडे वळावे असे आव्हान त्यांनी यावेळी केले. तसेच अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत करण्यात यावी यासाठी रमेश आडसकर यांनी तहसीलदार साहेबांना निवेदन दिले असेही सांगितले.

## विठ्ठलवाडी पोलिसांची धडक कारवाई गुन्हेतील ५ आरोपी पोलिसांच्या ताब्यात



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२५, कल्याण :** विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ६१०/२०२५ अंतर्गत दाखल प्रकरणातील पाहिजे आरोपींना गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने शोध घेऊन पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सदर गुन्हा BNS कलम १०९, १८९(२), १८९(३), १८९(४), १९०, १९१(२), १९१(३), ३५२, ३५१(२) सह आर्म ॲक्ट ४, २५, तसेच मपोका कलम ३७(१), १३५, १४२ अंतर्गत दाखल करण्यात आला होता.

ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत –

अमोल पांडुरंग सावंत (वय २२, रा. शेलू रेल्वे स्टेशनलगत, वांगणी, ता. कर्जत, जि. रायगड)

राहुल किशोर ठाकूर उर्फ बाबू (वय २२, रा. असे पाडा, निळकंठ नगर, आनंद विद्यालयाजवळ, उल्हासनगर-४)

करण राजू वंश (वय २०, रा. भीम कॉलनी, ओटी सेक्शन, उल्हासनगर-४)

याचबरोबर, हिल लाईन पोलीस ठाणे हद्दीतील हद्दपार आरोपी –

अर्जुन बाबू विटेकर (वय २०)

करण बाबू विटेकर (वय २०, दोघे रा. ४ नंबर, ५ ओटी शिक्षण, उल्हासनगर-५)

हे आरोपी अवंतिका एक्सप्रेस, बोरीवली रेल्वे स्टेशन येथे मिळून आले असून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे.

ही कारवाई विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी व पोलीस निरीक्षक (गुन्हे) चंद्रहार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक बी.आर. दराडे, पो.हवा. १०७२ मिसाळ, पो.हवा. ४६३६ चव्हाण, पो.हवा. ७३२७ सांगळे, पो.शि. ७६३६ राठोड, पो.शि. ८३८४ गायकवाड व पो.शि. ८२७० मोरे यांनी केली. पोलिसांकडून पुढील कार्यवाही सुरू असून आरोपींवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

## ठाणे शहर वाहतूक विभागातर्फे पथनाट्य स्पर्धा उत्साहात

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२५, डोंबिवली :** ठाणे शहर वाहतूक विभागाच्या वतीने साउथ इंडियन कॉलेज, डोंबिवली (पूर्व) येथे पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत ठाणे शहरातील एकूण १६ महाविद्यालयीन पथकांनी सहभाग घेतला.

स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली तर विजेत्या पथकांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. विशेष म्हणजे विजेते संघ यापुढे ठाणे आयुक्तालय स्तरावरील पथनाट्य स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत.

या स्पर्धेस माननीय सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक विभाग) किरण बालवडकर, सपोनि श्रीराम पाटील (डोंबिवली वाहतूक विभाग) आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अधिकारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. वाहतूक जनजागृतीसाठी आयोजित ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे विशेष ठरली.

## घरफोडी प्रकरणात सराईत चोरटा जेरबंद

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, पुणे :** पुण्यातील घरफोडी प्रकरणाचा उलगडा करताना गुन्हे शाखा युनिट-४ च्या पथकाने सापळा रचून एका सराईत चोरट्याला अटक केली. या कारवाईत तब्बल २ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

२४ सप्टेंबर रोजी रात्री गस्ती दरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, येरवडा परिसरातील एक इसम चोरीचे सोने खडकीकडे विक्रीसाठी नेत आहे. त्यानुसार होळकर ब्रिज परिसरात सापळा रचून त्याला पकडण्यात आले. अटक झालेल्याचे नाव विशाल संपत चंदनशिवे (वय २२, रा. चंदननगर, पुणे) असे असून, त्याच्याकडून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

तपासादरम्यान आरोपीने खराडी परिसरातील दोन घरफोड्यांची कबुली दिली. त्यामुळे खराडी पोलीस ठाण्यातील दोन गुन्ह्यांची उकल झाली आहे. आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या सोन्याचे दागिने परत मिळाल्याने पीडित नागरिकांनीही पोलिसांचे आभार मानले आहेत.

ही धडक कारवाई गुन्हे शाखा युनिट -४ पोलीस निरीक्षक अजय वाघमारे यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आली. या मोहिमेत उपनिरीक्षक वैभव मगदुम यांच्यासोबत पोलीस हवालदार अमजद शेख आणि देविदास वांढरे यांच्यासह युनिट-४ च्या पथकातील इतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

गुन्हे शाखेच्या या कामगिरीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात असून, अशा कारवायांमुळे चोरट्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांच्या दक्ष कारवाईमुळे पुणे शहरात कायदा व सुव्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास आणखी दृढ झाला आहे.

# पाटण नगरपंचायतीचा कचऱ्याचा प्रश्न पेटला!

## नगरपंचायतीच्या समोर ट्रॉली भरून कचरा ओतला...



सामाजिक कार्यकर्ते नितीन पिसाळ यांनी स्वखर्चातून तयार केलेल्या जनसेवा घंटा गाडीच्या माध्यमातून शहरातील, घरातीत साचलेला कचरा गोळा केल्याबद्दल नागरिक त्यांना धन्यवाद देत आहेत.

पाटण शहरात गेल्या काही दिवसांपासून कचरा गाडी येत नाही, त्यामुळे घरात कचरा साठून रहात असल्याने त्याच्यात किडे होत आहेत. त्यामुळे घरातील वृद्ध व्यक्ती, महिला, लहान मुले यांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. नगरपंचायत लक्ष देत नसल्यामुळे आम्ही स्वखर्चातून जनसेवा घंटा टागाडीचे आयोजन करून शहरातील कचरा गोळा केला नगरपंचायतीने याबाबत गांभीर्याने विचार करावा.

**– नितीन पिसाळ, सामाजिक आर्यकर्ते**

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२५, पाटण :** पाटण नगरपंचायतीच्या घंटागाड्या नादुरुस्त झाल्याने कचरा गोळा करायची म ोठी समस्या नगरपंचायतीच्या समोर आहे तर घंटागाडी कचरा गोळा करण्यासाठी येत नसल्याने पाटण शहरातील नगरपंचायतीचा ढिसाळ कारभारावर पाटण शहरातील नागरिक संताप व्यक्त करत आहेत.

पाटण शहरातील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यामध्ये. कचरा, नालेसफाई, विज, पाणी, या मूलभूत समस्यांनी उग्र स्वरूप धारण केले असून नागरिकांना सुविधा मिळत नाहीत. काही दिवसांपासून शहरात कचरा गोळा करणारी घंटा गाडी न आल्याने घरोघरी कचरा साठून राहिला होता. त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात असतानाच सामाजिक कार्यकर्ते नितीन पिसाळ यांनी स्वखर्चातून जनसेवा घंटागाडी कचरा गोळा करण्यासाठी घरोघरी फिरवून कचरा गोळा केला आणि हा कचरा पाटण नगरपंचायतीसमोर टाकून रोष व्यक्त केला. यापुढे कचरा गाडी वेळेवर आली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

अनेक प्रभागात कित्येक दिवस कचऱ्याची गाडीच आली नसल्याने कचऱ्याचे ढीग साचलेले दिसून येत आहेत. परिणामी या कचऱ्यामुळे दुर्गंधीने शहरात कहर केला आहे. त्यामुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून पाटण नगरपंचायत प्रशासनारविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. शहरात अनेक वेळा विज जाते. काही प्रभागात विजेच्या खांबावर बल्ब नाहीत नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांची दुरवस्था, तुंबलेल्या गटाराच्या घाणीचे साम्राज्य, त्यातून वळवणारे किटे, पिण्याचे पाणी कधी दोन दिवसांनी तर कयी अवेळी अशी ओरड, अशा एक ना अनेक गोष्टींसाठी ग्रामस्य नगरपंचायत प्रशासनाला प्रश्न विचारत असतील तर त्यात चुकीच काय आहे असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## नमुंमपा शाळांमध्ये विद्यार्थिनींकरिता आरोग्यविषयक विशेष मार्गदर्शन सत्रे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२५, ठाणे :** महिलांचे आरोग्य आणि सक्षम ीकरण हे कुटुंबाच्या, समाजाच्या तसेच संपूर्ण देशाच्या प्रगतीसाठी केंद्रस्थानी आहे. त्या अनुषंगाने दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे अभियान केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. हे अभियान महिला व बालविकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने साजरा करण्यात येत असलेल्या पोषण महिन्याशी संलग्न करुन राबविण्यात येत आहे.



या अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महानगरपालिकेच्या ५ रुग्णालयांमध्ये व २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये दररोज महिला व पुरुषांची सामान्य आरोग्य तपासणी तसेच नियोजित वेळापत्रकानुसार विशिष्ट तज्ज्ञ सेवा आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. १७ सप्टेंबरपासून अभियानांतर्गत एकूण २१८ शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून त्याचा लाभ १८८१५ महिला व १५९१५ पुरूष अशा एकूण ३४७३३ लाभार्थ्यांनी विविध तज्ज्ञांच्या सेवांसह घेतला आहे.

'स्वस्थ नारी – सशक्त परिवार' अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळीबद्दल मार्गदर्शनाची विशेष सत्रे घेण्यात आली. यामध्ये मासिक पाळी सुरू होताना शारीरिक विकासामुळे होणारे बदल काय असतात तसेच मुलींना मासिक पाळी का येते, मासिक पाळी दरम्यान स्वच्छता कशी राखावी, शरीराच्या विकासासाठी घ्यावयाचा पोषक आहार, मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या त्रासावर किंवा अडचणींवर उपाय याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच त्यांच्याशी संवाद साधून शंकांचे निरसनही करण्यात आले. या अभियानामध्ये २२६४ किशोरवयीन शालेय मुली यांनी समुपदेशनाचा लाभ घेतला.

'स्वस्थ नारी – सशक्त परिवार' अभियान महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या म ार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात प्रभावीपणे राबविण्यात येत असून जास्तीत जास्त महिलांनी व बालकांनी यामध्ये विनामूल्य आरोग्य तपासणी करुन घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

## सरदार पटेल महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिवस उत्साहात साजरा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित सरदार पटेल महाविद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना' (एनएसएस) स्थापना दिवस मोठ्या उत्साहात व सामाजिक जागरूकतेच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग व मेरा युवा भारत, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमात मेरा युवा भारत क्विझ स्पर्धा बाबत मार्गदर्शन करण्यात आले . यासोबतच 'रेड रिबिन क्लब' च्या माध्यमातून आरोग्य व एड्स जनजागृती विषयक उपक्रम व मार्गदर्शन राबविण्यात आले.




या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर यांनी भूषवले. कार्यक्रमाला रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलदीप आर. गोंड, डॉ. पुरुषोत्तम माहोरे, डॉ. निखिल देशमुख, डॉ. उषा खंडाळे, डॉ. वंदना खनके, ॲड. देवा पाचभाई यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विशेष अतिथी म्हणून मेरा युवा भारतच्या वतीने मंगेश दुबे कार्यक्रम सहायक व लेखापाल निरंजन मंगरूळकर, जिल्हा प्रवेक्षक, नॅशनल एड्स कंट्रोल, शासकीय रुग्णालय, चंद्रपूर, राखी देशमुख समपूदेशक सुरक्षा क्लिनिक, शासकीय रुग्णालय, चंद्रपूर, हे प्रामुख्याने उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. काटकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी एनएसएस च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण व स्वयंशिस्त कशी निर्माण होते यावर भर दिला. कार्यक्रमादरम्यान वर्षभर एनएसएस मध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच मेरा युवा भारत चंद्रपूर च्या वतीने उत्कृष्ट स्वयंसेवक दर्शन मेश्राम, शालिनी निर्मलकर, तन्वी पोपटे, यांना सम्म ानचिन्ह देऊन गौरवविण्यात आले. कार्यक्रमात शिक्षकेत्तर कर्मचारी, स्वयंसेवक व विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साही वातावरणात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

## मेगा बीच क्लीन ड्राईव्हला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२५, मिरा भाईंदर :** केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्दे शानुसार दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत स्वच्छता ही सेवा या पंधरवडा निमित्तस्वच्छोत्सव हा उपक्रम मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जल्लोषात साजरा होत आहे.या अभियानाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून इंटरनॅशनल कोस्टल क्लीनअप दिवसाच्या निमित्ताने दि. २० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ७ वाजता उत्तन बीच येथे मेगा बीच क्लीन ड्राईव्ह हा भव्य उपक्रम राबविण्यात आला.

मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत झालेल्या या भव्य उपक्रमास मिरा भाईंदरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महानगरपालिका अधिकारी व ५०० हून अधिक महानगरपालिका सफाई कर्मचारी, स्वच्छता निरिक्षक, स्थानिक नागरिक, विविध छत्रज्ञ, सामाजिक संस्था, बचत गट, राजकीय प्रतिनिधी आणि तब्बल ४००० हून अधिक



विद्यार्थ्यांनी स्वच्छतेच्या या सामूहिक मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या मोहिमेच्या निमित्ताने उत्तन समुद्र किनाऱ्यावरील ७४१० किलो कचरा गोळा झाला असून महानगरपालिकेच्या घंटागाडीतून पुढील प्रक्रियेसाठी प्रकल्पावर पाठविण्यात आला आहे.

उपस्थित मान्यवरांमध्ये महानगरपालिका आयुक्तांसह केंद्रशासन प्रतिनिधी राजेंद्र सिंग बोरा, अतिरिक्त आयुक्त प्रियांका राजपूत, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग) डॉ. सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, माहिती व जनसंपर्क अधिकारी राज घरत, वनक्षेत्र अधिकारी मनीष पवार, सहा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग)योगेश गुणीजन, सहा.आयुक्त स्वप्नील सावंत, सहा. आयुक्त जितेंद्र कांबळे यांच्यासह फॉर फ्युचर इंडिया या संस्थेचे स्वयंसेवक यांचा सहभाग होता. या उपक्रमाद्वारे केवळ किनाऱ्याचे सौंदर्यच वाढवले गेले नाही, तर स्वच्छतेबाबत जागरूकता, जनसहभाग आणि सामाजिक एकजूट पाहायला मिळाली. महानगरपालिकेच्यावतीने या उपक्रमात सहभागी सर्व संस्था, स्वयंसेवक, विद्यार्थी, नागरिक यांचे मन:पूर्वक आभार मानण्यात येत असून, महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की प्लास्टिक आणि इतर कचऱ्याचे योग्यरित्या विल्हेवाट लावा, किनाऱ्यावरील व सार्वजनिक ठिकाणांवरील स्वच्छता राखण्यासाठी सक्रिय सहभाग घ्या, सम द्रातील प्रदूषण टाळा आणि भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ, सुंदर आणि हरित मिरा भाईंदर घडविण्यासाठी सहकार्य करा.

